## शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या विद्यार्थ्यांची यादी व शिष्यवृत्ती अर्ज भरलेल्या सर्वच विद्यार्थ्यांसाठी सूचना

सुप्रिय विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी मुक्त विद्यापीठाने वारंवार दिलेल्या सूचनांचे पालन करून mahadbt Portal वरील Online अर्जातील सर्वच माहिती व्यवस्थित सादर करून आवश्यक सर्व Documents व्यवस्थित अपलोड केले आहेत. किंवा अपलोड केले नसल्यास ycmou.ac.inया संकेतस्थळावरील Scholarship टॅबमधील दि. 18.01.2019 च्या सूचनेप्रमाणे विद्यापीठाच्या scholarship@ycmou.digitaluniversity.acया mail id वर मेल केले आहेत, अशा विद्यार्थ्यांचे आवश्यक Documents क्लर्क लॉगीनने mahadbtPortal वर संबंधित विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन अर्जासोबत अपलोडकरण्यात येऊन अशा अर्जांची विद्यापीठाकडून प्राथमिक तपासणी करण्यात आली आहे. या तपासणीअंती प्रथमदर्शनी पात्र होऊ शकतील अशा 203 विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज (SC- 148, VJNT-23, OBC-29, व SBC-03)(महाडिबीटीच्या दि. 17.03.2019, 7.50 AMData नुसार) समाज कल्याण कार्यालय तसेच VJNT,OBC,SBC कार्यालयाकडे Forward करण्यात आले असून **इतर विद्यार्थ्यांना ईमेल, दूरध्वनीद्वारे संपर्क सुरू आहे. मात्र दुर्दैवाने नमूद करावे लागतेय की, बहुतांश विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळत नाहीये.**

आपणा सर्वांनाच माहिती असल्याप्रमाणे संबंधित कार्यालयांकडे मुक्त विद्यापीठासोबतच संपूर्ण नाशिकच्या महाविद्यालयांच्या प्राप्त अर्जांची जबाबदारीने तपासणी करण्याचे काम असून **अंतिमतः पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या आधार लिंक बँक खात्यावर शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्यात येणार आहे.**

सुप्रिय विद्यार्थी मित्रांनो, शिष्यवृत्तीचा लाभ आपणास मिळणार असल्यामुळे तो मिळविण्यासाठी आपल्या स्तरावरून प्रयत्न करणे आवश्यक असते, मात्र अतिशय खेद होतोय की, **ब-याच विद्यार्थ्यांना माहितीच नाही की, त्यांचे अर्ज त्यांच्या लॉगीनला परत आले आहेत. या विद्यार्थ्यांपैकी बहुतांश विद्यार्थी हे शिष्यवृत्तीसाठी पात्र होऊ शकतात, मात्र केवळ त्यांच्या अज्ञानामुळे, विद्यापीठ तसेच अभ्यासकेंद्रांकडून देण्यात येणा-या सूचनांकडे दुर्लक्ष केल्यामुळे या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागू शकते.**

अजूनही वेळ गेलेली नाही, माझे सर्व विद्यार्थ्यांना आवाहन आहे की, कृपया आपल्या महाडिबीटीच्या लॉगीनला जाऊन आपल्या शिष्यवृत्ती अर्जाचे Status ची तपासणी करावी व काही त्रुटी असल्यास त्याची तात्काळ पूर्तता करावी. **नव्याने अर्ज सादर करण्याची मुदत संपलेली असली तरीही यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केले होते व विद्यापीठाच्या लॉगीनला अद्यापही सदर अर्ज पडून आहेत अशा विद्यार्थ्यांनी तात्काळ कार्यवाही करून शिष्यवृत्तीचा लाभ घ्यावा.**

दि. 17.03.2019 सकाळी 7.50 वाजेपर्यंतच्या महाडिबीटीच्या Data नुसार समाज कल्याण कार्यालय तसेच VJNT,OBC,SBC कार्यालयाकडून मुक्त विद्यापीठाच्या प्रवेशित व **शिष्यवृत्ती अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांपैकी अंतिमतः पात्र ठरलेल्या 06 विद्यार्थ्यांची यादी (SC-02, VJNT-01, OBC-03) प्रसिद्ध करण्यात येत आहे.** या विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर संबंधित विभागाकडून शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्यात आली असून पात्र ठरलेल्या व Redeem केलेल्या विद्यार्थ्यांच्या खात्यावर ही रक्कम लवकरच जमा होईल.

या यादीतील व पुढील काळात अंतिमत: शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरतील अशा विद्यार्थ्यांचे अभ्यासकेंद्र, विभागीय केंद्र व मुक्त विद्यापीठ परिवाराकडून मन:पूर्वक अभिनंदन !

### शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची यादी

| |
|---|
| **SC** – 01. Sachin BhimrajNarayane 02. MonaliDnyaneshwarAhire |
| **VJNT**- Rahul ChandrakantGaware |
| **OBC** – 01. LaxmiNandkumarApune, 02. AkashRamkrushanPatil, 03. Ashvini Sanjay Patil |

**टिप :** **01.**कामाच्या व्यापामुळे वैयक्तिक Whats App संदेश बघता येत नसल्यामुळे व कुठल्याच संदेशांना सध्या उत्तर देता येत नसल्यामुळे विद्यार्थ्यांनी वैयक्तिक संदेश न पाठविता आपापल्या Whats App समूहावरच त्यांच्या शंका, अडचणी मांडाव्यात व इतर विद्यार्थ्यांनी शक्य असल्यास योग्य मार्गदर्शन करावे, ही विनंती.

**02.** कृपया यापुढे या विद्यापीठ संकेतस्थळावर वारंवार भेटी देऊन वेळोवेळी प्रसिद्ध होणा-या सूचना वाचाव्यात.